प्रकाशन क्रमांक : ११/२०२३

कृषि विज्ञान केंद्र, म.शे.स.मं. खरपुडी, जालना
जिल्हा रेशीम कार्यालय, जालना

# तुती रोपवाटीका (नर्सरी) तयार करणे तंत्रज्ञान

## तुती रोपवाटीका पासून तुती लागवड केल्याचे फायदे



तुती बागे मध्ये जिवंत झाडाचे प्रमाण ९०% पेक्षा जास्त राहते व बागेत तुट अळी पडत नाही. तुती बाग केवळ २.५ महिन्यामध्ये किटक संगोपनास योग्य होते. तुती बागे मध्ये सुधारित तुती वाणाचीच १००% लागवड करण्यात येते. पहिल्याच वर्षी तीन पीकांचे संगोपन घेता आल्याने काडी लागवड पेक्षा ५०-५५ हजार रूपये जास्तीचे उत्पादन मिळते.

## तुती रोपवाटीकेसाठी तुती बेण्याची निवड व छाटणी





तुती रोपवाटीकेसाठी तुतीच्या सुधारित व्ही-१ या तुती वाणाच्या बेण्याची निवड करावी. तुती बेणे सहा महिने जुने व करंगळी ते मधल्या बोटाच्या आकाराच्या जाडीचे असावे यापेक्षा जाड नसावे. तुती बेण्याची वाहतुक करून आणल्यानंतर ४८ तासाचे आत त्याची छाटणी करून ओलसर जमीनीत लागवड करावी. छाटणी केलेल्या व उर्वरित तुती बेण्यावर पाण्याचा शिडकाव करावा. धारदार हत्यार जसे कोयता किंवा सिकेटर द्वारे तुती बेण्यामधून काडी घेऊन तीन डोळ्यांवर ६-८ इंच किंवा टिचभर लांब अंतरावर छाटणी करून तुती कांडे तयार करावे. तुती कांडे ६-८ इंच किंवा टिचभर लांब पेक्षा जास्त लांबीचे होत असल्यास डोळ्या नंतरचा काडीचा भाग (भुतकांडे) कापून काड्याची लांबी कमी करावी.

## तुती बेण्यावर रासायनिक किंवा जैविक संप्रेरकांची प्रक्रीया



तयार केलेल्या तुती काड्या आधी कॅरेडेक्स/रूटेक्स-२ ग्रॅम तसेच कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणात ३० मिनीटे बुडवाव्यात किंवा आयबीए/आयएए २ ग्रॅम १०० मि.ली. अल्कोहोल घेउन चांगले मिश्रण तयार करावे व सदरचे मिश्रण ९०० मि.ली. पाणी मध्ये मिसळून द्रावण तयार करावे. या द्रावणास पसरट

प्लास्टीक भांड्यात घेऊन काड्याचा बुडाकडील माग फक्त ५-१० सेकंद द्रावणात बुडवुन बाजुला काढुन लागवड करावी. जैविक पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी जर्मीनेटर किंवा ईतर जैविक मुळे फुटण्यास मदत करणारे जैविके २ लिटर तसेच १ लिटर ट्रायकोडर्मा द्रावण घेऊन ५० लिटर पाण्यामध्ये मिश्रण तयार करावे. या द्रावणामध्ये तुती काड्या ३०-४५ मिनीटे बुडवुन लागवडी करीता वापर करावा.

## तुती रोपवाटीकेकरीता गादी वाफे तयार करणे

तुती रोपवाटीका तयार करणेसाठी चांगल्या/सुपिक जमिनीची निवड करावी. साधारणत: १.०० एकर तुती लागवडी करीता १० - १२ हजार तुती काड्यांची संख्या व किमान ५ गुंठे क्षेत्राची जमीन आवश्यक आहे. या ५ गुंठे जमीनीची चांगली मशागत करून जमीन भुसभुसीत करावी, मातीची ढेकळे फोडून बारीक माती करावी यामध्ये चांगले कुजलेले शेणखत व बारीक वाळु मिसळावी. तदनंतर साधारणत: ३.१५ फुट रूंद (१ मिटर), १० फुट लांब (३ मिटर) व १.५ फुट उंचीचे गादी वाफे तयार करावे. तयार केलेल्या गादी वाफ्यावर ठिबक तीन नळी (लॅटेरल) १-१ फुट अंतरावर अंथरून वाफा ओला करून घ्यावा. शेतकऱ्यास गादी वाफा करणे शक्य नसल्यास गहु पीकासाठी जसे वाफे करतात तसे प्रक्रीया केलेल्या तुती काड्याची वाफ्यामध्ये लागवड करणे.





## गादी वाफ्यामध्ये तुती काड्या लावणे

तयार केलेल्या गादी वफ्यावर तीन डोळे असलेली व प्रक्रिया केलेली काडी, दोन डोळे जमीनीमध्ये व एक डोळा जमीनीलगत राहील अशा प्रकारे लागवड करावी, वाफ्यामध्ये काड्या लावताना दोन काड्यातील अंतर १० से.मी. व दोन ओळीतील अंतर २० से.मी ठेवण्यात यावे.




-: लेखन व संकलन :-

**अजय मिटकरी, अजय मोहीते, श्रीकृष्ण सोनुने**

-: संदर्भ व सौजन्य :

**जिल्हा रेशीम कार्यालय, जालना**



-: प्रकाशक :-

**कृषि विज्ञान केंद्र**

मराठवाडा शेती सहाय्य मंडळ,

खरपुडी, जालना - ४३१२०३. (महाराष्ट्र)

प्रति २०००